राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पांतर्गत सातपाटी जि. पालघर शहरात भूमिगत विद्युत वाहिनी टाकणे बाबत............

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
(आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन)
शासन निर्णय क्र.आव्यप्र- २०१७/प्र.क्र.१६९(भाग-२) (३)/आव्यप्र-१
मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२.
दि. ०६ सप्टेंबर, २०१९

प्रस्तावना :

राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्प राज्याच्या रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, पालघर, मुंबई शहर आणि मुंबई उपनगर या जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत अलिबाग, रत्नागिरी आणि सातपाटी या शहरात भूमिगत विद्युत वाहिनी टाकण्याचे प्रस्तावित आहे.

महावितरण कंपनीव्दारे वरील कामे करण्यात येणार आहेत. महावितरण कंपनीने पालघर जिल्ह्यातील सातपाटी शहराबाबत सादर केलेल्या तपशिलवार प्रकल्प अहवालास (Detailed Project Report) जागतिक बँकेची मान्यता आणि महावितरण च्या संचालक मंडळाच्या झालेल्या बैठकीत पारित झालेला ठराव या दोन्ही गोष्टीनूसार यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

१. जागतिक बँक सहाय्यित राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पांतर्गत सातपाटी शहरात टाकावयाच्या भूमिगत विद्यूत वाहिनी संदर्भात मुख्य अभियंता (पायाभूत सुविधा/ आराखडा) महावितरण कंपनी यांनी राज्य दर- सूचीवर आधारित सादर केलेल्या रु. १७,२९,२८,९१२/- (रुपये सतरा कोटी एकोणतीस लाख अठ्ठावीस हजार नऊशे बारा फक्त) च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.
२. या कामी होणारा खर्च राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पातील कंपोनंट बी करीता केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्याकडून अनुक्रमे ७५ टक्के आणि २५ टक्के या प्रमाणे करण्यात येईल.
३. सातपाटी शहरात भूमिगत विद्यूत वाहिनी टाकण्याचे काम आर्थिक वर्ष २०१९-२०मध्ये करण्यात येईल. सदर काम १८ महिन्यात पुर्ण करण्यात यावे.
४. या कामी होणारा खर्च मागणी क्रमांक सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य ८०, सर्वसाधारण, १०२ आपत्तीप्रवण क्षेत्रामध्ये नैसर्गिक आपत्कालीन परिस्थितीबाबतच्या तातडीच्या योजनांचे व्यवस्थापन करणे (०६) चक्रीवादळ रोधक बांधकाम करणे (०६) (०१) चक्रीवादळ रोधक बांधकाम करणे (७५ टक्के केंद्र हिस्सा) (कार्यक्रम) (२२४५ २६०३) आणि मागणी क्रमांक सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य ८० सर्वसाधारण १०२ आपत्तीप्रवण क्षेत्रामध्ये नैसर्गिक आपत्कालीन परिस्थितीबाबतच्या तातडीच्या योजनांचे व्यवस्थापन करणे (०६) चक्रीवादळ रोधक बांधकाम करणे (०६) (०२) चक्रीवादळ रोधक बांधकाम करणे (२५

टक्के राज्य हिस्सा) (कार्यक्रम) (२२४५ २६३२) या लेखाशिर्षाअंतर्गत आर्थिक वर्ष २०१९-२० या वर्षाकरीता करण्यात आलेल्या तरतुदीतून करण्यात येईल.

५. मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली या प्रकल्पासाठी स्थापित करण्यात आलेल्या राज्य प्रकल्प सुकाणू समितीच्या दिनांक २४.६.२०१९ रोजी झालेल्या बैठकीत देण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यतेस अनुसरुन सदर आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१९०९०७१४५४५१५०१९ असा आहे. सदर आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRIRANG SHRIPATI GHOLAP

Digitally signed by SHRIRANG SHRIPATI GHOLAP
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9a2bc3b45be4b89f7c46c4474cf90b8a3c477e34c064494b04238ca50ee43db6, postalCode=400032, street=1ST FLOOR MAIN ROAD, MANTRALAYA, ou=REVENUE AND FOREST DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHRIRANG SHRIPATI GHOLAP
Date: 2019.09.07 15:00:30 +05'30'

(श्रीरंग घोलप)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. व्यवस्थापकीय संचालक, महावितरण कंपनी लि., प्रकाशगड, वांद्रे, मुंबई.
६. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई.
७. वित्तीय सल्लागार व सह सचिव, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई
८. आव्यप्र-१, संग्रहार्थ